 ISSN : 2348-7143
March 2019

# माडिया गोंड आदिवासी समाजाचे दारिद्र्य : विशेष संदर्भ गडचिरोली जिल्हा

**– प्रा.डॉ. तवार ए.टी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
**– सहा.प्रा. मडावी ए.डी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

भारतामध्ये आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समूहांना भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. भारतामध्ये आदिवासी जमाती मोठ्य प्रमाणात असून त्या संपूर्ण भारतात पसरलेल्या आहेत. २०११ च्या जनगणनेनूसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ८.६ टक्के लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. याचाच अर्थ असा की, १०.४३ कोटी पेक्षा जास्त आदिवासी लोक या भारत भूमीत वास्तव्य करतात. भारताच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात गेल्यास आदिवासी समाज पाहायला मिळतो. भारतातील आदिवासी जमातींमध्ये संख्येने सर्वात मोठी जमात 'गोंड' आहे. गोंड ही जमात प्रामुख्याने मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश या राज्यात पसरलेली आहे. भारत सरकारने काही आदिवसी जमातींना 'अतिमागास जमाती' (Primitive Tribe) म्हणून घोषित केले आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. त्यापैकी कातकरी (काथोडी), कोलाम आणि 'माडिया गोंड' या तीन आदिवासी जमातींचा समावेश अतिमागास जमातीमध्ये होतो. या तीन जमातींपैकी माडिया गोंड ही आदिवासी जमात गडचिरोली जिल्ह्यात दिसून येते. गडचिरोली जिल्ह्यातील 'भामरागड' तालुका हे माडिया गोंडांचे प्रमुख ठिकाण आहे.

**आदिवासीचा अर्थ**

आदिवासींचे अभ्यासक, विचारवंत, प्रशासक आणि सामाजिक कार्यकर्ते इत्यादींनी आदिवासींना विविध नावांनी संबोधले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने 'देशज' म्हणजे आदिवासी असे संबोधले आहे. काही विचारवंतानी अरण्यात राहणारे म्हणून वनवासी हा शब्द वापरला आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासींसाठी टोळी करून राहणारी जमात (Tribe) म्हणून 'अनुसूचित जमाती' (Schedule Tribe) असा उल्लेख केला आहे. हिंदीत 'जनजाती' असे म्हटल्या जाते तर मराठीत 'आदिवासी' हा शब्द वापरला जातो. आदिवासींचा अर्थ त्या-त्या ठिकाणाचे मूळ रहिवासी किंवा मूळ निवासी असा लावल्या जातो.

**महाराष्ट्रातील आदिवासी**

भारतात एकूण आदिवासींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनूसार १०.४२ कोटी एवढी आहे. त्यापैकी १०५.१० लाख आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९.३५ टक्के आहे. देशातील आदिवासी लोकसंख्येच्या संदर्भात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. भारताप्रमाणे महाराष्ट्रात देखील एका विशिष्ट भूप्रदेशात किंवा विभागात विशिष्ट आदिवासी जमातीचे वास्तव्य असल्याचे दिसून येते. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासी जमाती सुध्दा जंगली, पहाडी, दऱ्याखोऱ्यात व दुर्गम अशा भागात वास्तव्य करतांना दिसतात. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेला जिल्हा नंदुरबार असून या जिल्ह्यात एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ६९.३० टक्के आहे. त्यानंतर दुसरा क्रमांक गडचिरोली जिल्ह्याचा असून गडचिरोली जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ३८.६८ टक्के आहे.

**गडचिरोली जिल्हा एक दृष्टिक्षेप**

चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ ऑगष्ट १९८२ साली करण्यात आली. भारतातील अतिमागास जिल्हा सूचीमध्ये गडचिरोली जिल्ह्याचा समावेश होतो. गडचिरोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ १४,४१२ चौ.कि.मी. असून जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १२ आहे. नैसर्गिक संसाधनाच्या दृष्टिकोणातून गडचिरोली जिल्हा श्रीमंत आहे, परंतु आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्य तो मागास आहे. जिल्ह्याला विपूल वनसंपदा लाभलेली आहे. तसेच खनिज संपत्तीने समृध्द आहे. गडचिरोली जिल्हा जवळपास ७६% जंगलाने व्यापलेला आहे. या जिल्ह्यात घनदाट जंगल असल्याने माओवाद्यांनी १९८० च्या काळात प्रवेश केला आहे. आज गडचिरोली म्हणजे नक्षलग्रस्त जिल्हा अशी ओळख सर्वत्र निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यात आदिवासींसाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. शासनाने राबविलेल्या योजनांमुळे आदिवासींच्या जीवनमानात खरोखरच कितपत अनुकुल परिणाम होत आहेत हे अभ्यासण्यासाठी प्रस्तूत शोध निबंधातून माडिया गोंड आदिवासी समाजाचे दारिद्र्याचे अध्ययन केले आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

१) आदिवासी समाजाचा ऐतिहासिक आढावा घेणे.
२) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी कार्यरत असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
३) गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.
४) गडचिरोली जिल्ह्यात विविध आदिवासी योजनांच्या अंमलबजावणीमुळे माडिया गोंड आदिवासी समाजाला झालेला लाभ पाहणे.

**संशोधनाची गृहितके**

१) विविध शासकीय योजनांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील

माडिया गोंड आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीत बदल होत आहे.

२) गडचिरोली जिल्ह्याती माडिया गोंड आदिवासी समाजाचे राहणीमानात सुधारणा होत आहे.

३) गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड आदिवासी समाजाच्या आर्थिक शोशणाचे प्रमाण जास्त आहे.

४) गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड आदिवासी समाजावर रूढी आणि परंपरेचा मोठा प्रभाव आहे.

५) गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड आदिवासी समाज विकसित होत आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन (Descriptive Method) पध्दतीचा प्रामुख्याने उपयोग केला आहे. यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या (माडिया गोंड) संदर्भात असलेले अभ्यासाशी पुरक अशा प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन साधनांचा वापर करून संशोधन केले आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलीत करण्यासाठी आदिवासी (माडिया गोंड) व्यक्तींशी व्यक्तीगत संपर्क साधून त्यांच्याकडून ३२० मुलाखत अनुसूची भरून घेतली. तसेच सामाजिक व आर्थिक स्थिती विषयी त्यांच्याकडून चर्चा करून प्राथमिक माहिती संकलीत केली. दुय्यम स्त्रोतामध्ये ऐतिहासिक ग्रंथ, शासकीय अभिलेख, आकडेवारी, अहवाल, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली.

**आदिवासींच्या विकासासाठी काही निवडक योजना**

१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी)

२) केंद्रवर्ती अर्थसंकल्प न्युक्लिअस बजेट (नाविण्यपूर्ण) योजना.

३) सुधारीत क्षेत्र विकास मोहीम (माडा) क्षेत्र.

४) छोटे सुधारीत क्षेत्र विकास (मिनीमाडा) क्षेत्र.

५) आदिवासी युवकांना पोलिस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना.

६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र - योजना.

७) शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप पुरवठा योजना.

८) आदिवासींच्या जमीन सुधारणा कार्यक्रम.

९) रोजगार हमी योजना.

१०) पशुधन पर्यवेक्षकासाठी प्रशिक्षण.

**माडिया गोंड आदिवासी समाजाचे दारिद्रय**

'गोंड' ही भारतातील आदिवासी जमातींपैकी एक महत्वाची, सर्वात जास्त असणारी आणि मोठ्य भूभागावर वसलेली आदिवासी जमात आहे. गोंड या शब्दाचा अर्थ 'जंगलात राहणारा' असा आहे. माडिया गोंड ही गोंडाची पोट-जमात (Sub-Tribe) आहे. माडिया गोंड ही आदिवासी जमात अजूनही बरीच मागासलेली असल्याने 'आदिम जमाती' म्हणजे अति-मागास जमात म्हणून घोशित करण्यात आलेली आहे. ही जमात प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड व एरापल्ली तालुक्यात वसलेली दिसून येते. भामरागड सारख्या अतिदुर्गम भागात माडिया गोंड समाज वास्तव्य करीत असल्याने शिक्षण, रोजगार, प्रशिक्षण, आरोग्य इत्यादी सोयी-सुविधांपासून वंचीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा समाज आजही दारिद्र्याच्या अवस्थेत जीवन जगत आहे.

**माडिया गोंड समाजाच्या दारिद्र्याची कारणे**

**१) जंगली व दुर्गम भागात वास्तव्य:-** गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगलात व अतिदुर्गम भागात माडिया गोंड समाजाची वस्ती दिसून येते. भामरागड हे माडिया गोंड समाजाचे अस्तित्व मोठ्य प्रमाणात असलेले ठिकाण आहे. जंगली व दुर्गम भागातील वास्तव्यामुळे विकासाच्या शासकीय योजना राबविणे कठिण जाते. या भागात शासनाच्या विविध सोयी-सुविधांचा पुरवठा पाहिजे तसा होत नाही. पक्क्या रस्त्यांच्या अभावी तसेच नक्षल चळवळीमुळे शासनाला या समाजाच्या विकासाकडे फारसे लक्ष देता येत नाही. म्हणून माडिया गोंड आदिवासी समाजात दारिद्र्याचे प्रमाण मोठ्य प्रमाणात दिसून येते.

**२) निरक्षरतेचे प्रमाण:-** माडिया गोंड आदिवासी समाजात कमालीची निरक्षरता दिसून येते. सर्वेक्षण केलेल्या ३२० कुटूंबापैकी ६० ते ७० टक्के कुटूंब प्रमुख निरक्षर असल्याचे दिसून आले. शिक्षित कुटूंबप्रमुखांपैकी सर्वात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत. माडिया गोंड समाजात उच्च शिक्षण किंवा पदवी पर्यतचे शिक्षण घेतलेले कुटूंब प्रमुख दिसून आले नाही. शिक्षणाच्या अभावी विविध शासकीय योजनांची माहिती या समाजाला नसते. शासकीय योजनांची माहिती असली तरी त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा या बाबत जागृती या समाजाला नाही.

**३) शेती हा प्रमुख व्यवसाय:-** सर्वेक्षण केलेल्या सर्व ३२० माडिया गोंड आदिवासी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. हा समाज पूर्णपणे शेतीव्यवसायावरच अवलंबून आहे. शेतीचे उत्पन्न हे अनिश्चित असते. शेती व्यवसाय प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाने साथ दिली तर शेतीपासून उत्पन्न मिळते. शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी तो हंगामी स्वरूपाचा आहे. शेतीचा हंगाम संपल्यानंतर बहुसंख्य कुटूबांना रोजगार उपलब्ध नसतो. त्यामुळे माडिया गोंड समाज हा दारिद्रय अवस्थेत असल्याचे दिसून येतो.

**४) शेतीचा आकार:-** माडिया गोंड समाजाचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. असे असले तरी शेतीचा आकार मात्र फार मोठे नाही. सर्वेक्षण केलेल्या ३२० माडिया गोंड कुटूंब प्रमुखांपैकी जवळपास ९० टक्के कुटूंब प्रमुखाकडे ०.१ ते ५ एकर जमीन असल्याचे दिसून येते. एवढ्य कमी शेत जमीनीवर पूर्ण कुटूंबाच्या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. शेतीचा आकार लहान म्हणून उत्पन्नाने प्रमाण सुध्दा कमी असते.

**५) आधूनिक दृष्टिकोणाचा अभाव:-** आधुनिक जगात फार मोठा बदल घडून येत आहे. नवनविन यंत्रतंत्राचा शोध लावल्या जात आहे. काळानूसार मानवी जीवनमानात बदल घडून येत आहे. माडिया गोंड आदिवासी समाजामध्ये आधुनिक दृष्टिकोणाचा स्विकार पाहिजे तसा झालेला दिसून येत नाही. परंपरागत व्यवसाय, परंपरागत उत्पादन पध्दती, परंपरागत उत्पादनाची साधने यांचाच वापर मोठ्य प्रमाणात

होत असतांना दिसते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात पाहिजे तशी वाढ होत नाही. माडिया गोंड समाजात घेतले जाणारे उत्पन्न प्रामुख्याने उदरनिर्वाह पुरतेच मर्यादित असते. आपल्या दैनंदिन गरजा भागविणे यासाठीच उत्पादन किंवा व्यवसाय केला जातो. परंपरागत दृश्टीकोणामुळे या समाजातील लोकांच्या गरजा सुध्दा मर्यादितच असतात.

**उपाययोजना**

**१) शिक्षणाचे प्रमाण वाढविणे:–** माडिया गोंड आदिवासी समाजाचे दारिद्र्य दूर करावयाचे असेल तर सर्वप्रथम या समाजातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करणे फार गरजेचे आहे. विशेशत: उच्चशिक्षण व व्यवसायिक शिक्षणाची व्यवस्था या समाजातील लोकांना सरकारने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनातर्फे विशेष सोयी सवलती जसे वाहतुकीचे साधन, निवासाची सोय, आर्थिक मदत पुरवठा केल्यास दारिद्र्य दूर होण्यास मदत होईल. माडिया गोंड आदिवासी समाजामध्ये प्रामुख्याने माडिया भाशेचा वापर दैनंदिन व्यवहारात केला जातो. त्यामुळे या समाजाला माडिया भाशेत शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्यास शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

**२) सिंचन साधनात वाढ:–** शेतीचा विकास किंवा शेतीचे उत्पन्न वाढवायचे असेल तर सिंचन साधनात वाढ करणे अत्यंत आवश्यक असते. सिंचन साधनांच्या अभावी शेती व्यवसाय निसर्गावर अवलंबून असल्यास निसर्ग कधी साथ देतो तर कधी देत नाही म्हणजे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीच्या उत्पन्नात अनिश्चितता असते. सर्वेक्षण केलेले माडिया गोंड कुटूंबापैकी सिंचनाचे साधन म्हणून सर्वात जास्त तलावाचा वापर करीत असल्याचे दिसून येते. त्यानंतर विहीर या साधनाचा वापर केला जातो. सिंचनासाठी बोअरवेल किंवा कुपनलिका यांचा वापर अत्यंत कमी आहे. शासनाने या समाजाच्या सिंचन सुविधांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी विहीर बांधण्यास सवलत देणे, सवलतीच्या दरात विजपंप / तेलपंप पुरवठा करणे आवश्यक आहे. शक्य झाल्यास कॅनालची सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे.

**३) योजनांची माहिती देणे:–** आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविल्या जातात. परंतु या योजनांबाबत माहिती आदिवासी समाजाला मिळत नाही. त्यामुळे या योजनांचा लाभ आदिवासी समाजाला घेता येत नाही. माडिया गोंड समाज दारिद्र्य अवस्थेत व दुर्गम भागात असल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाऊन योजनांची माहिती घेणे शक्य होत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे शासकीय योजनांबाबत उदासिनता दिसून येते. शासनाने गाव स्तरावर योजनांची माहिती देणे व योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे तरच माडिया गोंड समाजाचे दारिद्र्य दूर होण्यास मदत होईल.

**४) इतर रोजगार पुरवठा करणे:–** शेती व्यवसायाबरोबर इतर रोजगार उपलब्ध नसल्याने माडिया गोंड समाजाला बारमाही रोजगार मिळत नाही. कारण शेती हा व्यवसाय प्रमुख असला तरी तो हंगामी स्वरूपाचा आहे. शेतीचा हंगाम संपल्यानंतर हा समाज रोजगारासाठी जंगल व्यवसायाकडे धाव घेतो. शेती व्यवसायाला जोडव्यवसाय म्हणून वन्य वस्तू गोळा करणे हा व्यवसाय केला जातो. जसे लाकूड गोळा करणे, डिंक संकलन, तेंदुपत्ता संकलन इत्यादी. परंतु शासनाच्या धोरणामुळे तसेच जागतिकीकरण व औद्योगिकरणामुळे या समाजाच्या जंगल व्यवसायवर बंधने येत आहेत. म्हणून शेती व्यवसायाबरोबर कुक्कुट पालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी प्रकारचे जोडव्यवसाय माडिया गोंड समाजाला शासनातर्फे उपलब्ध करून दिले पाहिजे.

**५) कर्जपुरवठ्यची सुविधा:–** शेती व्यवसाय असो किंवा इतर कोणताही व्यवसाय असो कर्ज पुरवठ्यची फार गरज असते. शेतीची मशागत करण्यापासून शेतीत सुधारणा करणे, विहिर खोदणे किंवा दुरूस्त करणे यासाठी शेतीव्यवसायाला कर्जाची गरज असते. शेतीव्यवसायाला जोड व्यवसाय म्हणून इतर व्यवसाय करण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. माडिया गोंड आदिवासी समाज हा गरीब आहे तसेच अशिक्षित आहे. कर्ज घेणे आणि आपल्या परिस्थितीत सुधारणा करणे याबाबत उदासिन असल्याचे दिसते. सर्वेक्षण केलेल्या माडिया गोंड कुटूंबापैकी २० टक्के कुटूंब कर्ज घेतल्याचे दिसून आले. ज्या कुटूंबांन कर्ज घेतले ते बँकेकडून न घेता सावकार किंवा सहकारी पतपुरवठा संस्था यांच्याकडून घेतल्याचे दिसून येते. म्हणून शासनाने या समाजाच्या विकासासाठी बँकेच्या सुविधांचा पुरवठा करणे तसेच सवलतीच्या दराने कर्ज देणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्ज घेण्याचे प्रमाण वाढून माडिया गोंड आदिवासी समाजाच्या प्रगतीत सुधारणा होण्यास मदत होईल.

**संदर्भ**

१. गुरूनाथ नाडगोंडे – भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (२०१२)
२. डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. एस.जी. देवगांवकर – आदिवासी विश्व, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (२०१५)
३. डॉ. प्रदीप आगलावे – आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (२०१२)
४. डॉ. शौनक कुलकर्णी – महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे (२००९)
५. डॉ. एस.जी. देवगांवकर – आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर (२०१६)